	नियमित दिवाणी दावा ७/२०२६ **सज्जन मारुती खामकर** **वि.** **बाबासो गोविंद खामकर**

नि. ५ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी याने प्रतिवादी यांनी दावा मिळकत १-अ मध्ये बांधकाम करू नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे.

३. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, दाव्यातील परिच्छेद क्र.१ अ व ब ही दावा मिळकत आहे. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे पूर्व हक्कदार यांची वाडवडिलार्जीत मिळकत होती. ते मयत झालेनंतर त्यांची मुले गोविंद व पांडुरंग यांचे नावाची नोंद झाली. गोविंद मयत झाल्यानंतर त्यांचे पश्चात त्यांची पत्नी पार्वती हिची एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून वर नमूद केलेल्या मिळकतीवरती आठ आणे हिस्स्याने नोंद झालेली आहे. तसेच पांडुरंग खामकर यांची वर नमूद केलेल्या मिळकतीवरती आठ आणे हिस्स्याने नोंद होती. वादी व प्रतिवादी यांचे पूर्व हक्कदार पार्वती गोविंद खामकर हिने तिचे आठ आणे हिस्से पैकी ११८.३० चौरस मीटर क्षेत्र हे त्यांचा मुलगा प्रतिवादी क्र. १ बाबासो खामकर यांना विक्री केलेले आहे. त्याच दिवशी मयत पार्वती गोविंद खामकर हिने उर्वरित क्षेत्र तिचा मोठा मुलगा मारुती गोविंद खामकर म्हणजेच वादी यांचे वडील यांना विक्री केलेले होते. तेव्हापासून वादी यांची सदर मिळकतीवरती मालकी हक्काने कब्जेवहिवाट होती. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी आपल्या नावाची नोंद फेरफार क्रमांक ८१९ ने केलेली होती. तसेच वादी यांचे वडील हे अडाणी

व अशिक्षित असल्यामुळे त्यांनी त्यांचे नाव नोंदविले दस्ताची नोंद अद्यापही मिळकतीवरती केलेली नव्हती. त्यामुळे यातील वादी यांचे पूर्व हक्कदार पार्वती गोविंद खामकर यांची या क्षेत्राकरिता एकत्र कुटुंब प्रमुख ची नोंद तशीच राहीली. त्यामुळे वादी यांचे वडील मारुती गोविंद खामकर हे अज्ञानी असल्यामुळे यातील प्रतिवादी यांनी त्यांचा अर्ज, जबाब, प्रतिज्ञापत्र सादर करून एकत्र कुटुंब प्रमुख ही नोंद कमी करून सहधारक म्हणून मारुती, बाबासो, पार्वती सुशीला व आनंदी यांच्या नावाची नोंद करण्यात आली. तसेच यातील वादी यांचे वडील मारुती गोविंद खामकर हे मयत झाल्यानंतर त्यांचे मृत्यूपासून सज्जन, संगीता व मनीषा यांच्या नावाची नोंद झाली. वास्तविकरित्या वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार पार्वती गोविंद खामकर यांनी केलेल्या नोंदणीकृत दस्ताप्रमाणे दावा मिळकतीपैकी ११८.३० चौरस मीटर क्षेत्र हे वादी यांचे वडील यांना विक्री केलेले होते, याची पूर्वकल्पना प्रतिवादी यांना होती. मात्र ही सर्व माहिती लपवून ठेवून यातील प्रतिवादी व त्यांचे बहीण व वादी यांच्या बहिणी यांनी नोंदणीकृत दस्त क्रमांक १५६ सन २०२२ ने वादी यांना हक्कसोड पत्राने नमूद केलेल्या मिळकतीमधील ११८.३ चौरस मीटर यामधील त्यांचा असणारा संपूर्ण हक्क सोडलेला आहे. त्यानुसार यातील वादी यांची नमूद केलेल्या मिळकतीवरती ११८.३० चौरस मीटर क्षेत्राकरिता नोंद झालेली आहे. वास्तविकरित्या वादी यांचे वडील तसेच मयत पार्वती गोविंद खामकर यांनी मुळातच क्षेत्र हे खरेदी दिलेले होते, याची पूर्ण कल्पना प्रतिवादी यांना होती. मात्र असे असताना देखील जाणून-बुजून वादी यांना खर्चात पाडून सदरचे हक्कसोडपत्र करून देण्यात आलेले आहे. त्यानुसार वादी यांच्या नावाची नोंद दावा मिळकती वरती झालेली आहे. तसेच वादी यांनी जुनी घर मिळकत पाडून त्यामध्ये घरकुल मंजूर झाल्यानंतर आरसीसी इमारत बांधण्याकरिता दिनांक १९.०७.२०२५ रोजी बांधकाम परवाना, ना हरकत दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला होता. त्याप्रमाणे ग्रामपंचायत कोडोली यांनी वादी यांना सदर बांधकामाकरिता ना हरकत दाखला दिलेला आहे. तसेच वादी यांनी बँकेकडून सदरबाबत कर्ज घेतलेले आहे व दावा मिळकतीमध्ये आरसीसी इमारत बांधलेली आहे. सदर इमारत बांधते वेळी

वादी यांनी त्यांचे हिस्सेस असणाऱ्या दक्षिण बाजूस पूर्व–पश्चिम व पश्चिम बाजूस दक्षिण–उत्तर या बाजूला प्रत्येकी दोन ते तीन फूट स्वतंत्र बोळ व जागा सोडून आपली इमारत बांधलेली आहे. तसेच प्रतिवादी यांनी वादी यांचे हिस्सेस असणाऱ्या क्षेत्रामधील दक्षिण बाजूस पूर्व–पश्चिम बाजूला यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकत १–ब मध्ये अलीकडेच बेकायदेशीर बांधकाम सुरू केलेले आहे. सदर बांधकाम करणेकरीता प्रतिवादी यांनी कोणतीही परवानगी घेतलेली नाही. तसेच सदर प्रतिवादी हे त्यांचे क्षेत्रामध्ये बांधकाम न करता उलटपक्षी वादी यांच्या क्षेत्रात बांधकाम करत आहेत. सदर बाबतची माहिती वादी यांना मिळाल्यानंतर त्यांनी प्रतिवादी यांना विचारणा केली व सदरचे बांधकाम काढून घेण्यास सांगितले. मात्र प्रतिवादी यांनी त्यास नकार दिलेला आहे. त्यानंतर वादी यांनी सदरचे अतिक्रमण झाले आहे किंवा कसे याची खातरजमा करणे करिता सिव्हील इंजिनियर ओंकार रणदिवे यांचेकडून सदर मिळकतीबाबतचा मॅप घेतला व तो मॅप त्यांनी या दाव्यासोबत जोडलेला आहे. त्यामुळे एकंदरीतच वादी हे प्रतिवादी यांच्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण करून बांधकाम करत आहेत. त्यामुळे सदर दावा वादी यांना दाखल करणे भाग पडले आहे. मुळातच वादी यांच्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी हे अतिक्रमण करून बांधकाम करत असल्यामुळे सदरबाबत तुर्तातुर्त मनाई मिळणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच तुर्तातुर्त आदेश न मिळाल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होणारे आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत दावा व मनाई अर्ज हा चुकीचा खोटा व लबाडीचा आहे. मुळातच वादी यांनी हेतूपुरस्सर सत्य परिस्थिती मे. न्यायालयाच्या समोर आणलेली नाही. मुळात दाव्यास कारण घडलेले नाही. या कामी वादी यांनी दावा मिळकत अनुषंगाने नकाशा हजर केलेला नाही. मुळातच असेसमेंट उताऱ्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये जुन्या घराचे वर्णन हे पक्के सिमेंटचे घर ३१.७४ स्क्वे. मी. असे दिसून येत आहे. मुळातच वादी यांचे वडील हे प्रतिवादी यांचेपेक्षा वयाने जेष्ठ असल्यामुळे घरातील सर्व कारभार वादी यांचे वडील

पाहत होते. प्रतिवादी हे भारतीय सैन्यात नोकरीस होते. त्यावेळी वादी लहान होते. सदरवेळी वादी यांचे वडीलच घरातील सर्व कौटुंबिक व्यवस्था पाहत असल्यामुळे प्रतिवादी यांचा वादी यांचेवर अतोनात विश्वास होता. मात्र प्रतिवादी हे भारतीय सिमेवर कामगिरी बजावत असतेवेळी वादी हे बेकायदेशीर कृत्यांमध्ये गुंतलेले असल्यामुळे कायद्याने वादी यांना तुरुंगवास झाला. प्रतिवादी यांचे चुलते पांडुरंग यांनी प्रतिवादी यांना त्यांचे स्वतःचे १/२ हिश्याचे मृत्यूपत्र रजिस्टर दस्त क्र. ५२०/१९९८ ने करून दिलेले होते. पांडुरंग यांच्या मृत्यूनंतर सि. स. क्र. १५४७ च्या १/२ सदरी प्रतिवादी यांच्या नावाची नोंद झाली होती. यामध्ये वादी यांचा कोणताही हक्कसंबंध नव्हता. सदर १/२ हिश्यामध्ये घर असून त्याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. १७९५ असा होता. त्या ठिकाणी प्रतिवादी हे पूर्वीपासून राहत होते व आहेत. तसेच १५४७ चे उर्वरित १/२ हिश्याचे क्षेत्र हे वादी व प्रतिवादी यांचे वडील गोविंद यांचे मालकीचे होते. गोविंद हे वादीचे वडील मारुती व प्रतिवादी हे लहान असतानाच मयत झाल्यामुळे गोविंद यांची पत्नी पार्वती हिचे नावे सदरचे क्षेत्र नोंद झाले होते. तसेच ग्रामपंचायत दप्तरी देखील पार्वती हिच्या नावाची नोंद होती. मात्र वादी हा चुकीच्या व बेकायदेशीर व्यवसायामध्ये गुंतलेला असल्यामुळे तसेच त्यास तुरुंगवास झाल्यामुळे भविष्यात दोघांभावांमध्ये वाटणीसाठी वाद होवू नये म्हणून पार्वती हिने जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सर वादीचे वडील व प्रतिवादी या दोन्ही मुलांचे स्वतःचे हयातीमध्ये सदर १/२ हिश्याचे वाटप करून दोन हिस्से केलेले होते. सदर हिश्याचे क्षेत्र दोघांच्या नावावर होण्यासाठी जसे हिस्से ठरले त्या प्रमाणे वादीचे वडील मारुती व प्रतिवादी यांची दोघांची नावे एकाच वेळी, एकाच दिवशी, एकाच तारखेला रजिस्टर दस्त क्र. २१२६/२००३ व २१२८/२००३ ता. ०७.०८.२००३ रोजी खरेदी दस्त करणेत आले. सदर खरेदी दस्तापैकी दस्त क्र. २१२६/२००३ हा खरेदीचा दस्त प्रतिवादी यांचे नावे झाल्यानंतर त्यांनी त्याची नोंद प्रॉपर्टीकार्डास करून घेतलेली होती. मात्र वादी यांचे वडील मारुती यांनी त्यांचे झालेल्या खरेदी दस्त क्र. २१२८/२००३ ची नोंद प्रॉपर्टीकार्डास करून घेतलेली नव्हती. त्यानंतर जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सर वादी याने देखील सदरची नोंद करून

घेतलेली नाही. त्यामुळे मारुती यांचे स्वतःच्या चुकीच्या व संपूर्ण क्षेत्र स्वतःच्या नावे करून घेण्याची कृती फसलेली होती. सदरची बाब पार्वती हिने ओळखलेली होती. म्हणूनच पार्वती हिने योग्य व अचूक निर्णय घेवून तसेच मुलींना समजावून व्यवस्थित भावांमध्ये स्थावर मिळकतीचे कागदपत्र सोयीनुसार करून ठेवलेले होते. सदर खरेदीपत्रास मुली पार्वती, सुशिला, आनंदी यांनी दि. ३१.१२.२००३ रोजी मान्यता पत्र देखील वादीचे वडील व प्रतिवादी यांचे नावे करून दिलेले आहे. त्यामुळे सि. स. क्र. १५४७ मधील गोविंद यांचा उर्वरित १/२ हिस्सा गोविंद यांच्या पत्नी पार्वती हिने दोन्ही मुले म्हणजेच वादीचे वडील व प्रतिवादी यांचे नावे करून आपसातील वादी संपविलेले होते. मात्र ही कोणतीही वस्तुस्थिती वादी याने अभिलेखावर आणलेली नाही. त्यामुळे वादी हा स्वच्छ हाताने मे. न्यायालयात आलेला नाही. त्यानंतर वादी हा तुरुंगात असल्यामुळे वादी याचे वडिलांनी प्रतिवादी तसेच अन्य नातेवाईक यांचेकडून हातउसन्या रक्कमा घेतलेल्या होत्या. तसेच कोर्ट कामी वादी याचे वडिलांना बराच खर्च झालेला होता. त्यामुळे वित्तीय संस्था व देणेकरी हे नेहमी वादी यांचे वडिलांकडे रक्कम मागण्यास येत होते आणि म्हणूनच वादी यांचे वडिलांनी सदर नोंद ही ग्रामपंचायत तसेच सिटी सर्वे येथे केली नव्हती. परिणामी आई पार्वती मयत झाल्यानंतर तिची नोंद एक. कु. पु. अशीच झाली. सदरची फेरफार डायरी ही सन २०१५ मध्ये नोंद होवून सर्व वारसांची नावे पुन्हा सिटी सर्वे कार्यालयात नमूद झाली. तदनंतर पुन्हा वारसांचे सोडपत्र हे दस्त क्र. १५६/२०२२ ने एकटया वादीकरिता लिहून दिले. त्यानंतर एकटया वादीची नोंद सि. स. क्र. १५४७ मधील १/४ हिश्यास म्हणजेच ११८.३ चौ. मी करिता झालेली होती. मात्र ही सर्व बाब वादीने लपवून ठेवलेली आहे. प्रतिवादी यांनी वादीस नेहमीच मदत केलेली असून त्याला नेहमीच अडचणीतून बाहेर काढलेले आहे. मुळातच ज्यावेळी सण २००३ मध्ये आपसातील दस्ताने आप आपले हिस्से हे निश्चित झाले तिथपासून चतुःसिमेनुसार ज्याचे त्याचे क्षेत्र जो तो उपभोगत होता. त्यानुसार सि. स. क्र. १५४७ चे ११८.३ चौ. मी उत्तर बाजूचे रस्त्याकडील घर याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. १७९३ हे घर वादी यांचे पूर्वहक्कदार म्हणजे वादी यांना प्राप्त झाले होते व

आहे. त्याचे मागील बाजूचे दक्षिणेकडील क्षेत्र ११८.३० चौ.मी क्षेत्राची रिकामी जागा होती त्यामध्ये कोणतेही बांधकाम नव्हते ते क्षेत्र प्रतिवादीस प्राप्त झालेले होते. सदर क्षेत्राचा उपभोग घेत असतेवेळी कोणतीही अडचण प्रतिवादीस निर्माण होवू नये तसेच सदर जागेत प्रतिवादीने भविष्यात घर बांधल्यास त्याचे येणे जाण्याकरिता वादीचे रस्त्याकडून मुख्य रस्त्याकडील बाजूने पश्चिम बाजूस दक्षिण उत्तर ५८ फूट लांबीचा व पूर्व पश्चिम ४.६ रुंदीचा बोळ सोडलेला होता. सदरचा बोळ हा वादीच्या क्षेत्रात सोडलेला होता. त्याचे क्षेत्र २४.७९ इतके आहे. सदरचा रस्ता हा उत्तर बाजूच्या वादीच्या ११८.३० चौ. मी मधूनच सोडलेला होता. सदर रस्ता हा दक्षिणेच्या प्रतिवादी यांचे क्षेत्रापर्यंत प्रतिवादी यांचेकरिताच सोडलेला होता. मुळातच सदर २४.७९ हे क्षेत्र वादीच्या हिश्यातून कमी केल्यास वादी यास प्रत्यक्षात ९३.५१ चौ.मी एवढेच क्षेत्र राहते. मुळातच सदर ४.६ फूट रस्तेकरिता वादी व प्रतिवादी यांचेमध्ये लेखी करारपत्र दि. ०७.०८.२००२ रोजी झालेले आहे. सदर करारपत्रावर वादीचे वडील तसेच प्रतिवादी व साक्षीदार यांनी सहया केलेल्या आहेत. सदरचे करारपत्र हे पूर्ण झाल्यानंतर प्रतिवादी यांनी वादीचे वडिलांकडे झेरॉक्स प्रत दिलेली होती. अस्सल प्रत प्रतिवादी यांचेकडे ठेवलेली आहे. मात्र ही कोणतीही वस्तुस्थिती वादी याने न्यायालयासमोर आणलेली नाही. मुळातच सदर ठरलेल्या वहिवाटीनुसार बांधकाम करण्याचे वादी व प्रतिवादी यांचे ठरलेले होते. त्याच वेळी वादी यास घरकूल योजनेअंतर्गत शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळत असल्यामुळे वादीने प्रथम बांधकाम करण्याच्या ठरविले व तो त्यानुसार प्रथम बांधकाम करू लागला. त्याचवेळी प्रतिवादी हे देखील दक्षिण बाजूस बांधकाम करू लागले. मुळातच वादी याच्या संमतीने प्रतिवादी यांनी बांधकाम सुरु केले होते. त्यामुळे आता वादी यास त्यास नकार देता येणार नाही. तसेच त्यास बांधकाम थांबविण्यास अधिकार देखील नाही.

५. प्रतिवादी तर्फे वकील यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, ग्रामपंचायत मिळकत क्र. १७९४ करिता प्रतिवादी याने बांधकाम परवाना दि. २०.०३.२०२६ रोजी

मिळविलेली आहे. त्यानुसारच प्रतिवादी हा बांधकाम करत आहे. मात्र वादी याने स्वतःचे बांधकाम पुर्ण करत असतेवेळी पुर्व पश्चिम ४.५ रुंदीचा बोळ सोडलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी याचे बांधकामास हरकत अडथळा होत होता. तसेच त्यांचेमध्ये वाद विवाद होत होते. वादी हा प्रतिवादी यांचेवर अरेरावी करत होता. तसेच वादी याने जाणीवपूर्वक ग्रामपंचायत कोडोली यांचेकडे खोटया व चुकीच्या तक्रारी करून प्रतिवादी यांचे बांधकाम थांबविण्याकरिता दबाव टाकून स्वतः मात्र चुकीच्या पद्धतीने तो बांधकाम करत राहिला. त्याच वेळी प्रतिवादी यांचे बांधकाम संपूर्ण पिलर उभे होवून स्लॅबपर्यंत येईपर्यंत वादी हा गप्प राहिला. त्याच वेळी स्वतःचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर तो प्रतिवादीचे बांधकामास हरकत अडथळा करू लागला. त्यामुळे प्रतिवादी यांनी दि. ०५.०१.२०२६ रोजी वकिलांमार्फत नोटीस पाठविली होती. सदर नोटीस मिळून देखील वादी याने स्वतःचे बांधकाम घाईगडबडीत पुर्ण करून घेतले. त्याच वेळी प्रतिवादी हे हदयविकाराचे आजाराने आजारी असल्यामुळे ते विश्रांती घेत होते. मात्र त्याच वेळी गैरफायदा घेवून खोटी कागदपत्रे, खोटे चुकीचे हातनकाशे घेवून मे. कोर्टास दर्शवून एकतर्फा आदेश मिळविलेला आहे. त्यामुळे सदर कामी प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने नाही. उलटपक्षी कोर्टाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी यांनी तात्काळ स्वतःचे बांधकाम थांबविले. त्यामुळे बांधकामाच्या स्लॅपकरिता असणाऱ्या स्लॅप प्लेट, लोखंडी सळया व इतर साहित्य अडकून राहून त्याचे भाडे प्रतिवादीस भरावे लागले आहे. त्यामुळे प्रतिवादी याचे चार लाखांहून अधिक नुकसान झालेले आहे. मुळातच वादी याने रणदिवे इंजिनियर यांचा हातनकाशा दाव्यासोबत दाखल केलेला आहे. त्यामध्ये देखील रणदिवे यांनी अचूक मोजमाप दर्शविलेले नाही. मोघम स्वरुपाचे आकृती नकाशा दिलेला आहे. त्यामुळे एकंदरीतच वादी यास दंड होणे आवश्यक आहे. मुळातच प्रतिवादी यांनी बांधकाम कोठून करायचे व जाणे येणे कोठून करायचे हा प्रश्न प्रतिवादी यांना निर्माण झालेला आहे. तसेच वादी याने पद्धतशिररित्या दि. ०७.०८.२००२ रोजी झालेल्या करारपत्रास बगल देवून नाकारून संपूर्ण मिळकत गिळकृंत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिवादी यांनी कधीही अतिक्रमण केलेले

नाही. त्यामुळे सदर कामी वादी याचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रतिवादी तर्फे वकील यांनी **वासुदेव नेने वि. दत्तात्रय जोग २००० (३) ऑल. एम. आर १९३** या न्यायनिर्णयावर त्यांची भिस्त ठेवली आहे. अंतिमतः प्रतिवादी तर्फे वकील यांनी वादी यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली

६. वादींचा अर्ज, प्रतिवादी यांचे म्हणणे, दोन्ही बाजूंतर्फे दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले. तसेच वादी तर्फे सन्माननीय विधिज्ञ श्री. डी. एम. पाटील व प्रतिवादी तर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री.एन. सी. खामकर यांचा सखोल युक्तिवाद ऐकला. या सर्व बाबींचा विचार करता माझे विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालील प्रमाणे नोंदवित आहे.

अनु. क्र.	**मुद्दा**	**निष्कर्ष**
१	सकृतदर्शनी दावा वादीचे लाभात आहे का ?	**नकारार्थी.**
२	न्यायाचे समतोलत्व वादीचे बाजूने झुकत आहे का ?	**नकारार्थी**
३	मागणीप्रमाणे तूर्तातूर्त ताकीद न दिलेस वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे का ?	**नकारार्थी**
४	आदेश काय ?	**अंतिम आदेशानुसार**

कारणमीमांसा

मुद्दा क्र. १ ते ३ करिता :-

७. सदर तिन्ही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे व चर्चेसाठी सुलभ होणार असल्यामुळे ते एकत्रित विचाराधीन घेण्यात आलेले आहेत.

८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ पुढील प्रमाणे :-

"(१) कोणत्याही दाव्यात शपथपत्रावरुन किंवा अन्यथा, –

(अ) एखाद्या दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेचा दाव्यातील कोणत्याही पक्षकाराकडून अपव्यय केला जाण्याचा, तिचे नुकसान केले जाण्याचा किंवा ती अन्यक्रामित केली जाण्याचा अथवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना गैरपणे विक्री केली जाण्याचा धोका असल्याचे, अथवा

(ब) प्रतिवादी त्याच्या धनकोची [फसवणूक करण्याच्या] दृष्टीने त्याची मालमत्ता हलवण्याची किंवा तिची विल्हेवाट लावण्याची धमकी देत आहे किंवा ती मालमत्ता तशा रीतीने हलविण्याचा किंवा तिची विल्हेवाट लावण्याचा त्याचा उद्देश असल्याचे,

(क)दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात प्रतिवादी, वादीला त्याचा कब्जा काढून घेण्याची धमकी देत आहे अथवा त्याविषयी अन्यथा वादीला क्षती पोचवत आहे.

असे सिद्ध करण्यात आल्यास न्यायालयाला, दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत, अशी कृती निरुद्ध करण्यासाठी आदेशाद्वारे तात्पुरता मनाईहुकूम देता येईल, किंवा अश मालमत्तेचा अपव्यय, नुकसान, अन्यक्रामण, विक्री, ती हलवणे अथवा तिची विल्हेवाट लावणे, [किंवा दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात वादीकडून कब्जा काढून

घेणे किंवा अन्यथा वादीला क्षती पोचवणे] या गोष्टी स्थगित करण्याच्या आणि त्यांना प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनासाठी, न्यायालयाला योग्य वाटेल असा अन्य आदेश देता येईल.

(२) न्यायालयाला, स्थगनादेशासाठी आणि मालमत्तेचा अपव्यय, नुकसान, अन्यक्रमण, विक्री, ती हलविणे किंवा तिची विल्हेवाटयाला प्रतिबंध करण्यासाठी किंवा पोटनियम (१) खालील दाव्याच्या वादग्रस्त अशा कोणत्याही मालमत्तेला अन्यथा क्षती पोहोचवण्यास वादीला प्रतिबंध करण्यासाठी अशी कोणतीही कृती करण्यास किंवा असा अन्य आदेश काढण्यास तात्पुरती मनाई करताना वादीला प्रतिभूमी किंवा न्यायालयाला योग्य वाटेल अशी अन्य गोष्ट करण्याबाबत निदेश देता येईल."

९. प्रस्तुत दाव्यातील कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता वादी यांनी दावा हा आज्ञार्थी व कायम मनाईकरिता दाखल केला असल्याचे दिसून येत आहे.

१०. मुळातच प्रस्तुत कामी वादी याच्या कथनानुसार दावा मिळकत ही वडिलार्जित मिळकत होती. त्यामध्ये प्रतिवादी यांनी केवळ मिळकती सदरी त्यांच्या नावाची नोंद केलेली होती तर वादी यांचे वडील अशिक्षित असल्यामुळे त्यांच्या नावाची नोंद झालेली नाही. त्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी हे जादा क्षेत्रात बांधकाम करत आहेत.

११. मुळातच वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता त्यात फेरफार तसेच इतर नोंदी या सन २००३ तसेच सन २००७ मधील दिसून येत आहेत. मुळातच जर सन २००३ अथवा सन २००७ मध्ये सदर नोंदी या

चुकीच्या झाल्या होत्या तसेच प्रतिवादी यांनी क्षेत्राची नोंद केली होती तर त्यांच्या अनुषंगाने वादी यांनी कुठेही दाद मागितलेली दिसून येत नाही. तसेच सदर कामी वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून वादी यांच्या मिळकती शेजारीच एक घर दिसून येत आहे. सदर घराच्या अनुषंगाने वादी यांनी उल्लेख केलेला असला तरी सदर घराचा दावा मिळकत अनुषंगाने हिस्सा किती आहे व त्याचे क्षेत्र किती आहे हे दाव्यातील कथनावरून नेमके स्पष्ट होत नाही. त्यामुळे केवळ वादी कथन करतो एवढ्याच म्हणण्यानुसार प्रतिवादी याने दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले आहे असे म्हणता येणार नाही. तसेच सदर कामी दाव्यामध्ये सुनावणी झाल्या खेरीज नेमके कोणाचे क्षेत्र किती आहे व नेमके कोणत्या क्षेत्राकरिता वादी व प्रतिवादी यांची वहिवाट आहे हे समजून येणारे आहे. तसेच सदर कामी प्रतिवादी यांच्या कथनानुसार जो दोन इमारतीमधील बोळ अस्तित्वात आहे तो सदर ठिकाणी वादी यांनी बांधकाम करण्याच्या अगोदर पासून होता किंवा कसे हे सुनावणी झाल्याशिवाय समजून येणारे नाही.

१२. सदर कामी प्रतिवादी यांनी वादी यांचे पूर्व हक्कदार व प्रतिवादी यांचे दरम्याने बोळाच्या अनुषंगाने झालेले करारपत्र दाखल केलेले आहे. सदर करारपत्राच्या तारखेचे अवलोकन केले असता, ती तारीख दि. ०७.०८.२००३ अशी दिसून येत आहे. सदर करारपत्रानुसार वादी व प्रतिवादी यांचेमध्ये चार फूट रुंदीचा बोळ रस्ता सोडण्याचा आहे असे कथन दिसून येत आहे. मात्र सदर अनुषंगाने वादी यांनी कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे एकंदरितच सदर करारपत्र हे झाले होते किंवा कसे हे सुनावणी नंतरच ठरणारे आहे. मात्र त्याच वेळी प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या ग्रामपंचायत मिळकत क्र. १७९४ च्या असेसमेंट उताऱ्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये पडसर खुली जागा व त्याचे क्षेत्रफळ १२१० चौ.फूट असे दिसून येत आहे. त्याच प्रमाणे प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या ग्रामपंचायत मिळकत क्र. १७९५ यामध्ये पक्के घर तसेच पहिला मजला त्याचे

बांधकाम वर्ष १९८० व त्यामध्ये क्षेत्रफळ १०४४ चौ. फूट दिसून येत आहे. मुळातच सदर कामी वादी यांनी दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या वर्णनाचे अवलोकन केले असता, सदर कामी मुळातच प्रतिवादी यांच्या नावावर २२५४ चौ. फूट एवढी मिळकत दिसून येत आहे. त्यामुळे एकंदरितच प्रतिवादी वादी यांच्या जागेत अतिक्रमण करतो आहे हे कोणत्याही प्रकारे समजून येत नाही. तसेच सदर दोन्ही ग्रामपंचायत मिळकत अनुषंगाने वादी यांचे नाव असल्याबाबत प्रतिवादी यांनी या आधी कोठेही का दाद मागितली नाही ते समजून येत नाही. तसेच वादी याचे वडील अशिक्षित होते हे एवढेच कारण पुरेसे ठरणारे नाही. त्यामुळे केवळ प्रतिवादी बांधकाम करून अतिक्रमण करत आहे एवढेच वादी याचे कथन नि.५ अनुषंगाने पुरेसे ठरणारे नाही.

१३. त्याचप्रमाणे प्रस्तुत कामी नि.५ अर्ज मंजुर केल्यास वादी याचे नेमके कोणते नुकसान होईल हे कोणत्याही प्रकारे समजून येत नाही. मात्र उलटपक्षी सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होईल असे वाटते. त्यामुळे एकंदरीतच वादी यांना सकृत दर्शनी केस नाही असे वाटते.

१४. वादी तर्फे वकील यांनी दाखल केलेल्या **वासुदेव नेने वि. दत्तात्रय जोग २००० (३) ऑल. एम. आर १९३** या न्यायनिर्णयामध्ये दावा मिळकत ही बरीच वर्षे सामनवोला उपभोगत होता. सदर दावा मिळकतीमध्ये असणारे काजूची झाडे उखडून टाकण्याचा अपीलकर्ता याने प्रयत्न केल्यामुळे प्रस्तुत दावा हा कायम मनाईकरिता दाखल करण्यात आला होता.
सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

१५. त्यामुळे एकंदरितच न्यायाचा तुळ वादीच्या बाजूने नाही असे वाटते.

सबब, वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे असे वाटते.

१६. त्यामुळे सकृतदर्शनी प्रकरण हे वादीच्या लाभात नसल्यामुळे मी **मुद्दा क्र. १ ते ३** चा निष्कर्ष **नकारार्थी** देत आहे.

मुद्दा क्र. ४ करिता :-

१७. वरील सर्व गोष्टीचा एकत्रितरित्या विचार केला असता वादी हा तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी पात्र नाहीत असेच वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

आदेश

१. **वादी यांचा नि.५ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करणेत आलेला आहे.**

२. **या न्यायालयाने दिलेला दि.१७.०१.२०२६ रोजीचा एकतर्फा तूर्तातूर्त मनाई आदेश रद्द करणेत येत आहे.**

३. **या अर्जाचा खर्च दाव्याच्या मुळ खर्चात समाविष्ट करण्यात यावा.**

18/7/26

दि. १८.०७.२०२६

(के. दि. काकतकर)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.